दै. सकाळ Today लातूर मंगळवार १५/१०/२०१९
पान ४

# महाराष्ट्रातील किल्ल्यांवर विद्यार्थ्यांनी लिहिले मोडीतून पुस्तक

लातूर, ता. १४ : महाराष्ट्रातील किल्ले या विषयावर शाहू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या मोडी हस्तलिखित पुस्तकाचे प्रकाशन सोमवारी करण्यात आले. महाविद्यालयाच्या इतिहास अभ्यास मंडळाच्या उद्घाटन सोहळ्यात हे प्रकाशन झाले.

इतिहास अभ्यास मंडळाचे उद्घाटन डॉ. शिवराज बोकडे (जि. नांदेड) व डॉ. लहू गायकवाड (नारायणगाव, जि. पुणे) यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, विभागप्रमुख डॉ. अर्चना टाक उपस्थित होत्या. डॉ. बोकडे यांनी इतिहासाचा इतर सामाजिकशास्त्रांशी असलेला संबंध सोप्या भाषेत समजावून सांगितला. इतिहास हा गतकालीन मानवी जीवनाचा आरसा असून, तो सर्व सामाजिकशास्त्रांची जननी आहे, असेही ते म्हणाले. डॉ. गायकवाड यांनी इतिहास संशोधनातील आपले विविध अनुभव कथन करीत असताना त्यातील बारकावे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. इतिहासातून शिकण्यासारखे काय आहे, यावर डॉ. गव्हाणे यांनी भाष्य केले.

बी.ए. तृतीय वर्ष या वर्गातील विद्यार्थी विक्रांत शंके यांनी लिहिलेल्या तिसऱ्या वर्गाचा विजय या फ्रेंच राज्यक्रांतीवर आधारित नाटकाचे सादरीकरण याप्रसंगी विद्यार्थ्यांनी केले. स्वप्नील मयाचारी आणि प्रतीक्षा मोरे यांनी सूत्रसंचालन केले.

Scanned by CamScanner